# ‘मुकुल माधव’, ‘फिनोलेक्स’तर्फे आयोजित शिबिराला प्रतिसाद

**रत्नागिरी : शहर वार्ताहर**

मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्यावतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने रत्नागिरीतील महिलांना विशेष भेट मिळाली आहे. महिलांसाठी सवलतीच्या दरात मॅमोग्राफी चाचणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिबिराची सुरुवात दि.७ रोजी झाली असून १९ मार्चपर्यंत ते सुरू राहणार आहे. हे शिबिर रत्नागिरीतील परकार रुग्णालयात सुरू आहे.

या चाचणीमुळे कॅन्सरसारख्या भयंकर रोगाचे सुरुवातीच्या टप्प्यात व वेळेत निदान होण्यास मदत होते. रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रेरणा देशभ्रतार यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी जयश्री गायकवाड, एमआयडीसीच्या अभियंता सौ. नागवेकर, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे संचालक संजय मठ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठल्ये हेही उपस्थित होते. फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या वतीने कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांतर्गत काम पाहणाऱ्या मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकाराने रत्नागिरी येथे महिलांसाठी १३ दिवसांचे आरोग्य तपासणी शिबिर सुरू आहे. या शिबिरात सवलतीच्या दरात मॅमोग्राफी आणि कॉल्पोस्कोप चाचणी करून देण्यात येत आहे. मॅमोग्राफी ही विशेष वैद्यकीय पद्धती आहे. त्यात कमी तीव्रतेचे एक्स-रे वापरले जातात. त्यामुळे महिलांमधील स्तनाचा कर्करोगासारख्या आजारांचे लवकर निदान होते. त्यामुळे तो आजार टाळणे व यशस्वीपणे बरा करण्यास मदत होते.

फिनोलेक्स वुमन्स वेल-बीईंग क्लिनिक रत्नागिरी येथे २०१४ साली सुरूवात करण्यात आले. हा मुकुल माधव फाउंडेशनचा उपक्रम आहे. त्याला फिनोलेक्स पाईप्सतर्फे मॅमोग्राफी चाचणी करण्यासाठीचे मशीन तसेच, कॉल्पोस्कोप हे दान करण्यात आले आहे. कॉल्पोस्कोपीद्वारे सर्व्हिकल कॅन्सरची योग्य प्रकारे तपासणी

पान २ वर ▶

पान १ वरून

# ‘मुकुल माधव’, ‘फिनोलेक्स’तर्फे आयोजित शिबिराला प्रतिसाद

करण्यात येते. रत्नागिरी जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आणि शहरातही इतरत्र कुठेही अशा प्रकारची अद्ययावत यंत्रणा उपलब्ध नाही. कोकणातील, विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यातील महिलांमध्ये स्तनाचा कॅन्सर आणि सर्व्हिक्स (गर्भाशय मुख) कॅन्सर याबाबत जनजागृती निर्माण करणे हा या शिबिरामागचा प्रमुख हेतू आहे. त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यातच रोगाचे निदान होईल आणि त्यांना तो बरा करणे शक्य होईल. ही बाब महिलांच्या आरोग्याबरोबरच संपूर्ण कुटुंबाच्या दृष्टीने कल्याणाची आहे, असे फिनोलेक्स इंडस्ट्रिज लिमिटेडचे सीएसआर समन्वयक डॉ. आशुतोष मुळ्ये यांनी सांगितले. या शिबिरात मॅमोग्राफी चाचणीसाठी लागणारी रेडिओग्राफी डायग्नोस्टिक सेवा ऑन्को-सर्जिकल सेवा पुण्यातील प्रशांती कॅन्सर केअर मिशनचे डॉ. सी. पी. कोप्पीकर यांनी उपलब्ध करून दिली आहे.